# अमरावती महानगरपालिका अमरावती

जा. क्र. अमनपा/आयु/पर्यावि/ १८६/२०२४
दिनांक : ०८/०९/२४

## जाहिर सुचना

अमरावती शहरातील नागरीकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, पतंगोत्सवाकरीता नायलॉन मांजाच्या वापरासंदर्भात मा. राष्ट्रीय हरीत लवाद, नवी दिल्ली येथे याचिका क्र. ०६/२०२० (मुळ या.क्र. ३८४/२०१६) व मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपुर, जनहित याचिका क्र. ०१/२०२१ दाखल आहे. प्रस्तुत याचिकेमध्ये दि. ०६/०१/२०२३ रोजी आदेश निर्गमित झाले असून सदरहु आदेशान्वये नायलॉन मांजाचे विक्री, वापर यावर प्रतिबंध घालण्याकरीता या संदर्भातील कारवाई अधिक व्यापक करण्याबावत निर्देश प्राप्त आहेत. मा. उच्च न्यायालयाचे निर्गमित आदेशानुसार नायलॉन मांजाचा वापर करणाऱ्या / बाळगणाऱ्या व्यक्तिविरुध्द ०६ **महिन्यापर्यंत शिक्षेसह कमीत कमी रु.१०,०००/- दंडाची तसेच नायलॉन मांजाची निर्मिती, विक्री, विक्रीकरीता वाहतुक करणाऱ्या व्यक्तिविरुध्द ०३ ते ०५ वर्षांपर्यंत शिक्षेसह किमान १,००,०००/- रुपये दंडाची तरतुद** करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार –अ क्रमांक ५९ , पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ दिनांक – ०२ मार्च २०२३ नुसार (सिंथेटीक) कृत्रिम किंवा बारीक चुरा केलेली काच, धातू किंवा अन्य कोणताही तीक्ष्ण पदार्थ यांनी अवगुंठित केलेला असा कोणताही धागा, यांची **विक्री, उत्पादन, साठवण, पुरवठा आणि वापर प्रतिबंध करण्यात आले आहेत.** त्याअनुषंगाने पतंग उडविण्याकरीता नायलॉन मांजा सोबतच बारीक चुरा केलेली काच, धातू किंवा अन्य कोणताही तीक्ष्ण पदार्थाचा वापर करून तयार केलेला धागा शहरातील कोणत्याही विक्रेत्याने विक्री करु नये याकरीता उपाययोजना म्हणून, नायलॉन मांजा तसेच वर नमुद धागा जप्तीची कार्यवाही करणे, धागा/ मांजा जप्त करुन अशा आस्थापनांना वर नमुदप्रमाणे दंडात्मक स्वरुपाची कारवाई करण्याकरीता सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी यांचे नियंत्रणात झोननिहाय जेष्ठ स्वास्थ निरीक्षक, स्वास्थ निरिक्षक यांचे पथक यापुर्वीच गठीत करण्यात आले असून या पथकामध्ये महसूल व पोलीस विभागाच्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार पतंग व मांजा विक्री **करण्याकरीता महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाची संमती अनिवार्य करण्यात आली आहे.** त्याअनुषंगाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे संमतीशिवाय पतंग व मांजा विक्री करणाऱ्या सर्व आस्थापनांना तात्काळ सिल करण्यासंदर्भातील कार्यवाही करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने अशा सर्व आस्थापनांनी संमती प्राप्त करून घेण्याकरीता प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, या कार्यालयाशी संपर्क साधावा.

सर्व पालकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, आपले पाल्य पतंग उडविण्याकरीता नायलॉन मांजाचा वापर करत असेल किंवा प्रतिबंधीत मांजा बाळगत असेल तर तुमच्या पाल्यावर फौजदारी पात्र कारवाई होवून त्याचे भविष्य अडचणीत येवू शकते याबाबतची गांभीर्यपुर्वक नोंद घ्यावी व असे करण्यापासुन आपल्या पाल्यास परावृत्त करावे.

नायलॉन मांजाचे वापरामुळे जिवितास तसेच पक्षांना मोठ्या प्रमाणावर क्षती पोहचते यामुळे मकर संक्रांतीच्या उत्सवादरम्यान पक्ष्यांचे दगावण्याचे प्रमाणात वाढ होते. नायलॉन धागा अविघटनशील असल्यामूळे त्याचे विघटन होत नाही, तसेच नायलॉन मांजाच्या संर्पकाने विद्युत प्रवाह खंडित होणे, शॉक लागणे, तसेच दुचाकीस्वार, पादचारी यांना इजा होणे किंबहुना जिवित हानी होते, अशा घटना घडू नये याकरीता पतंग उडविण्याकरीता नायलॉन धागाचा (मांजा) वापर करू नये तसेच शहरातील कोणत्याही विक्रेत्याने नायलॉन मांजाची विक्री, साठा, वहन (ट्रान्सपोर्टेशन) करु नये असे आवाहन अमरावती महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

(सचिन कलंत्रे, भा.प्र.से.)
आयुक्त
महानगरपालिका अमरावती